# आकाशवाणी पुणे

## प्रादेशिक वृत्त विभाग

## पुणे वृत्तांत

## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 03.12.2025** **वार- बुधवार**

---

**दिव्यांग**

दिव्यांगांच्या जागतिक दिनानिमित्त पुणे जिल्हा परिषद आणि बालकल्याण संस्था, यांच्याद्वारे आज आयोजित विशेष कार्यक्रमात पुणे जिल्ह्यातील 85 पेक्षा जास्त मान्यताप्राप्त दिव्यांगांच्या विशेष शाळा आणि कार्यशाळेतील विद्यार्थी, प्रशिक्षणार्थी सहभागी झाले. दिव्यांगांसाठी भव्य बाल आनंद मेळाव्याचंही आयोजन करण्यात आलं. पुणे जिल्हा परिषदेनं दिव्यांगांसाठी तयार केलेल्या "स्पंदन" या ऑनलाईन नोंदणी पोर्टलचं या कार्यक्रमात लोकार्पण करण्यात आले. पुणे जिल्ह्यातील दिव्यांग व्यक्तींना विविध शासकीय योजना आणि सुविधांचा लाभ मिळवून देणं हा या पोर्टलचा मुख्य उद्देश आहे.

**कुष्टरुग्ण**

राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत पुणे परिमंडळातील तीन जिल्ह्यांमध्ये कुष्ठरोग तपासणी आणि निदान मोहीम हाती घेण्यात आली. एक कोटीपेक्षा जास्त नागरिकांची तपासणी केल्यानंतर कुष्ठरोगाचे 35 हजार 561 संशयित रुग्ण आढळून आले, यापैकी 177 रुग्णांमध्ये कुष्ठरोगाचं निश्चित निदान झालं आहे अशी माहिती पुणे परिमंडळाचे आरोग्य उपसंचालक डॉक्टर भगवान पवार यांनी दिली.

**याद्या**

पुणे विभागातील पाच जिल्ह्यांमध्ये पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघांच्या 1 नोव्हेंबर 2025 या अर्हता दिनांकावर आधारित मतदार यादी नव्यानं तयार करण्याचा कार्यक्रम सुरु आहे. त्याअंतर्गत विभागीय आयुक्त तथा पुणे विभाग पदवीधर आणि शिक्षक मतदार संघाचे मतदार नोंदणी अधिकारी डॉक्टर चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या हस्ते राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत आज प्रारुप मतदार याद्या प्रकाशित करण्यात आल्या.

आतापर्यंत पदवीधरसाठी २ लाख 72 हजार 44 तर शिक्षक मतदार संघासाठी 44 हजार 214 मतदारांनी नोंदणी केली आहे. 18 डिसेंबरपर्यंत दावे आणि हरकती दाखल करता येतील.

**मानीव**

पुणे जिल्ह्यातील सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या मानीव अभिहस्तातंरणाबाबत प्रलंबित प्रकरणांचा विचार करता प्रक्रिया गतीनं पूर्ण करावी असे निर्देश जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी आज दिले. जिल्हाधिकारी कार्यालयात मानीव अभिहंस्तांतरण जिल्हास्तरीय समन्वय समितीच्या आढावा बैठकीत ते बोलत होते.

**हलाल**

हलाल' ही संकल्पना एका विशिष्ट धर्माशी संबंधित असून मुख्यत्वे मांसाहारी खाद्यपदार्थांपुरती मर्यादित आहे. त्यामुळं 'हलाल' प्रमाणपत्र आणि त्यासंबंधित तांत्रिक आणि प्रशासकीय अनियमितता दूर करून ते केवळ सरकारी प्रणालीद्वारेच व्हावं. तसंच या नियमावलीत आवश्यक ते बदल करावेत, अशी मागणी राज्यसभा खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांनी आज राज्यसभेत केली. शून्य तासादरम्यान त्यांनी या मुद्दा उपस्थित केला होता.

**डेलनेट**

ग्रंथालयं ही  केवळ पुस्तक संग्रहालयं न राहता भविष्यासाठी अद्ययावत तंत्रज्ञानानं सुसज्ज असलेली स्मार्ट ग्रंथालयं तयार व्हायला हवीत, अशी अपेक्षा सावित्रीबाई  फुले पुणे  विद्यापीठाचे  प्र- कुलगुरू डॉक्टर पराग काळकर यांनी आज पुण्यात व्यक्त केली. डेव्हलपिंग लायब्ररी  नेटवर्क - डेलनेटच्या 28 व्या नॅक्लिन राष्ट्रीय परिषदेचं उद्धाटन करताना ते बोलत  होते. यंदाच्या ज्ञान, ग्रंथालय आणि माहिती नेटवर्किंगवरील '28 व्या राष्ट्रीय अधिवेशनाचं आयोजन ग्रंथालयांसाठी नवीन सीमा निर्माण करणं- अन्वेषण, नवोन्मेष, उत्क्रांती आणि परिवर्तनाला चालना देणं या मध्यवर्ती संकल्पनेवर  करण्यात आलं असून पाच डिसेंबरपर्यंत  ही  परिषद  चालणार  आहे. या राष्ट्रीय  परिषदेसाठी देशभरातून 250 पेक्षा जास्त ग्रंथपाल आणि ग्रंथालय तंत्रज्ञान क्षेत्रातील  तज्ञ सहभागी झाले आहेत.

लेखक मारुती यादव यांनी लिहिलेल्या 'हसरे जग भाग 6' ह्या पुस्तकाचं प्रकाशन माध्यमकर्मी श्रीराम रानडे यांच्या हस्ते काल पुण्यात करण्यात आलं. जीवनातील अंधकार नाहीसा करणारी ज्योत म्हणजे हास्य असं मत रानडे यांनी व्यक्त केलं. तर विनोदी लेखनाद्वारे अनेक जणांचं दुःख मी कमी करू शकलो हेच खरं पुण्य आहे अशी भावना यादव यांनी व्यक्त केलं.

**खेळ**

पुण्यातील न्यू इंग्लिश स्कूल रमणबाग प्रशालेत, आयोजित तीन दिवसीय क्रीडा महोत्सवाचं उद्घाटन क्रीडा भारतीचे अखिल भारतीय संघटन मंत्री राज चौधरी यांच्या हस्ते आज करण्यात आलं.
प्रशालेचे माजी विद्यार्थी, राष्ट्रीय खो-खो पटू नंदन परांजपे यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

**रेबीज**

पिंपरी चिंचवड महापालिका आणि मिशन रेबीज यांच्याद्वारे 'पीसीएमसी रेबीज नियंत्रण कार्यक्रम' या मोहिमेची सुरुवात काल निगडी इथं करण्यात आली. हा कार्यक्रम वर्षभर राबविण्यात येणार असून या अनुषंगानं विशेष हेल्पलाईनचं उद्धाटन तसंच लसीकरण पथकं आणि रेबीज प्रतिसाद पथकासाठी नियुक्त वाहनांचंही लोकार्पण यावेळी करण्यात आलं.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**